पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १०

**सभावृत्तांत**

दिनांक - **०८/०९/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०८/०९/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते - सभापती**
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ - उपसभापती
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.फुगे भिमाबाई पोपट
५. मा.अड.भोसले सचिन सुरेश

या शिवाय मा.कडूसकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) वाल्हेकरवाडी व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) नवमहाराष्ट्र व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.भिमाबाई फुगे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) कै.दशरथ नामदेव कापसे, व्यायामशाळा व त्यावरील रिक्त सभागृह सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.भिमाबाई फुगे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) महापौर चषक आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धा २०१७-१८ आयोजित करणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) खिंवसरा पाटील तालिमीतील मातीला खाद्य व मशागत देणेबाबत – मा.सचिन भोसले, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.४८ दिनांक २८/०८/२०१७ मध्ये दुरुस्ती करणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **२८/०८/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.९)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ५० विषय क्रमांक - ०१

दिनांक - ०८/०९/२०१७

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव -

चिंचवड मधील वाल्हेकरवाडी व्यायामशाळा दरमहा र.रु.२,०००/- सेवाशुल्क तत्वावर व मनपा नियमानुसार तीन वर्षे कालावधीकरिता गुरुदेवनगर मित्रमंडळ, आकुर्डी या मंडळास चालविण्यास देण्यात यावी. गुरुदेवनगर मित्र मंडळ, आकुर्डी या मंडळाचा रजिस्टर नंबर महा १४९९/१३ हा आहे. गुरुदेवनगर मित्र मंडळाचे काम अतिशय चांगल्या पध्दतीचे आहे. तरी सदरची व्यायामशाळा गुरुदेवनगर मित्र मंडळ, आकुर्डी यांना सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५१ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०८/०९/२०१७

सुचक : मा.भिमाबाई फुगे अनुमोदक : मा.बाळासाहेब ओव्हाळ

संदर्भ : मा.भिमाबाई फुगे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्यानिकेतन प्राथमिक शाळेजवळील नवमहाराष्ट्र व्यायामशाळा “ मैत्री स्वयंरोजगार सेवा संस्था, पिंपरीगाव ” या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,०००/- सेवाशुल्क मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५२ विषय क्रमांक - ०३

दिनांक - ०८/०९/२०१७

सुचक : मा.भिमाबाई फुगे अनुमोदक : मा.बाळासाहेब ओव्हाळ

संदर्भ : मा.भिमाबाई फुगे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कै.दशरथ नामदेव कापसे, पिंपरीगाव व्यायामशाळा, त्यावरील रिक्त सभागृह “ मैत्री स्वयंरोजगार सेवा संस्था, पिंपरीगाव ” या संस्थेस ११ महिने

कराराने दरमहा र.रु.२,०००/- सेवाशुल्क मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५३ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०८/०९/२०१७

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, भारतीय कुस्ती संघटना यांच्या मान्यतेने माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये मोशी येथे महापौर चषक आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धा २०१७-१८ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सार्वनुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५४ विषय क्रमांक - ०५

दिनांक - ०८/०९/२०१७

सुचक : मा.सचिन भोसले अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.सचिन भोसले, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव -

खिंवसरा पाटील व्यायामशाळेमध्ये थेरगाव, वाकड तसेच मुळशी परिसरातील ४० ते ४५ पैलवान नियमित सराव करीत असतात. सर्व पैलवान कुस्तीचा सराव याच मातीच्या हौदात नियमितपणे करतात. त्यामुळे ही माती सराव करण्यासाठी योग्य प्रतीची व आरोग्यदायक असणे आवश्यक आहे. परंतु बरेच वर्षापासून या मातीला खाद्य मिळालेले नाही. तसेच या हौदातील मातीची मशागत देखील करण्यात आलेली नाही. तरी लवकरात लवकर सदर तालीमीमध्ये मातीला खाद्य व मशागतीसाठी र.रु.४५,०००/- (अक्षरी र.रु.पंचेचाळीस हजार फक्त) किंवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सार्वनुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५५ विषय क्रमांक – ०६

दिनांक - ०८/०९/२०१७

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव -

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्रमांक ४८, दि.२८/०८/२०१७ मध्ये तरी सदरची व्यायामशाळा एकविरा सेवा संघ, चिंचवड यांना सेवाशुल्क

तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता यानंतरचे " **देणेत येत आहे** ” हे शब्द वगळून त्या ऐवजी " **देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे**. ” याप्रमाणे दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सार्वनुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **लक्ष्मणशेठ सोपान सस्ते** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/११२२/२०१७
दिनांक : १४/०९/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 17 sub committee sabhapati.doc